# प्रकरण ४ - अ.

## -: शैक्षणिक व सामाजिक नियम :-

### -: शिक्षणाचे नियम :-

शिक्षण हे एक शास्त्र आहे. त्यामुळे ते कोणत्याही काळातील असले तरी त्या त्या काळानुसार त्याचे विशिष्ट नियम असणारच. उपनिषत्काळी शिक्षणासंबंधीचे नियम हे प्राधान्याने विद्यार्थ्यांसाठी असत. आणि शिक्षण संपेपर्यंत ते विद्यार्थ्यांना बंधनकारक असत.

शिक्षण एक शास्त्र आहे तसेच ते एक पवित्र व विधायक कार्य ही आहे. शिक्षणाच्या योगे संस्कार होतात त्यातून भारतीय संस्कृतीचे रक्षण होत असते. नवी पिढी सुशिक्षित व सुसंस्कारित घडवीत असताना त्यांना कडक बंधने पाळावी लागत. देहाला सुखासीनतेची सवय चटकन लागते पण कष्टाची व दीर्घोद्योगाची सवय, इंद्रियनिग्रह या गोष्टी अंगवळणी पडण्यास वेळ लागतो. शैक्षणिक बंधनातून त्याचे वळण लावले जाते. सुरवातीला कठीण व कटू वाटले तरी अंतिम कल्याणकारक, हितदायक असेच हे शैक्षणिक नियम आहेत. आणि ते गुरुगृहीच अंगवळणी पडणे आवश्यक असते.

गुरुंच्या कडे विद्यार्थ्यांचे महत्वाचे १२ ते १४ वर्षांचे आयुष्य व्यतीत होत असते.हा कालावधी संस्काराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मातीच्या गोळ्याला जसा आकार द्यावा तसे रूप त्याला प्राप्त होते. विद्यार्थी देखील लहान वयाचे असल्याने त्यांच्यावर चांगले

संस्कार केल्यास त्यातून आदर्श व्यक्तिमत्वाची जडणघडण होणार, हे कार्य गुरुगृही गुरुंकडूनच होत असे.
प्राचीन काळी उपनयन संस्कारानंतर गुरुंकडे जाऊन शिष्याच्या शिक्षणास आरंभ होत असे. हा उपनयन संस्कार देखील शिक्षण होण्यास पात्रता निर्माण करणारा संस्कार आहे. या संस्काराने ब्राह्मणाचा द्विज होत असे. त्या शिवाय वैदिक अध्ययन करता येत नसे. मेखला, कौपीन, यज्ञोपवीत धारण करुन बटूकडून अग्नीला हवन करण्यात येत असे. गुरु शिष्यांचे परस्परांवर निस्सीम प्रेम व अढळ श्रध्दा आहे हे दर्शविण्यासाठी हृदयस्पर्शनाचा विधी करण्यात येई. विद्यार्थ्यांच्या छातीवर हात ठेवून, "आपल्या दोघात चिरकालीन प्रेम व विश्वास नांदावा" अशा अर्थाचा मंत्र यावेळी गुरु जपत असत.

उपनयन संस्कारानंतर अध्ययनाला प्रारंभ करण्यापूर्वी सूर्याच्या प्रार्थनेचा मंत्र शिकविण्यात येत असे. याला "सावित्री" असे नाव आहे. तो गायत्री वृत्तात असल्याने त्याला "गायत्री" असेही म्हणतात.

तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि।
धियो यो नः प्रचोदयात्।।

आपले अध्ययन हे सूर्यासारखे तेजस्वी व्हावे.
सूर्यदेवतेचे साहाय्य आपल्याला लाभावे, आपली बुध्दी तल्लख व्हावी, बुध्दीला चालना मिळावी म्हणून ही सूर्याला प्रार्थना केलेली आहे. आजच्या काळात देखील हे संस्कार व त्या संस्कारांचा पवित्र अर्थ विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे आवश्यक आहे.

अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांत ज्ञान लालसा पाहिजे. अभ्यासू व जिज्ञासू विद्यार्थ्यांनाच गुरु ज्ञान देत असत.
आळशी व ऐतखाऊ विद्यार्थ्यांबद्दल गुरु अनास्था दाखवित असत.
उदा.- उपकोसल व आरुणिपुत्र श्वेतकेतू.
श्वेतकेतू[3]- :- बारा वर्षे गुरुगृही राहिला पण त्याचे वर्तन नम्रतेचे नव्हते. जिज्ञासू वृत्ती नव्हती. त्यामुळे त्याला ज्ञान प्राप्ती झाली नाही. गुरुनिंदा केल्याबद्दल त्याच्या पित्याने त्याची कानउघाडणी केली.
उपकोसल[४]- :- अत्यंत आळशी प्रवृत्तीचा - खायचा, प्यायचा व झोपा काढायचा. ज्ञानाची तळमळ त्याला नसल्याने जाबाल ऋषीने त्याला शिकविले नाही. पण जेव्हा त्याला ज्ञान मिळविण्याची इच्छा निर्माण झाली शरीराचे चोचले पुरवायचे कमी करुन "अनशन" चालू केले तेव्हा ज्ञानार्जनास पोषक अशा वृत्ती तयार झाल्या. अध्ययनाकडे लक्ष लागू लागले. मग तो विद्वान झाला.

गुरुंच्याकडे शिकायला आल्यानंतर विद्यार्थ्याचे वर्तन तपासले जाई. तो प्रामाणिक, श्रद्धाशील, कष्टाळू आहे की नाही हे पाहिले जाई. तसेच त्याची बौध्दिक कुवत, सद्वर्तन, नम्रता इ. गुणांची कसोटी लागत असे. त्यात निवड करुन मगच त्याला शिक्षण देण्यात येत असे.

गुरुगृही शिकत असता ब्रह्मचर्यपालन व गुरुंचे आज्ञापालन विद्यार्थ्यांना करावे लागत असे. गुरुंची सेवा नम्रतेने करणे आवश्यक असे.
दंड धारण करावा, भिक्षा मागावी, श्रद्धेने अन्न भक्षण करावे, विद्यार्थ्याने दिवसातून फक्त दोन वेळेलाच अन्नग्रहण करावे. त्यापूर्वी ही गुरुंची परवानगी घ्यावी.

वेदाध्ययनापूर्वी व नंतर शास्त्रोक्तविधीने गुरुंच्या दोन्ही चरणांना स्पर्श करुन व हात जोडून "ब्रह्मांजलि" चे आचरण केले पाहिजे. अध्ययन करण्यापूर्वी "भोअधीष्व" असे गुरुनी सांगितल्यावर अध्ययनास आरंभ करावा. त्यानी "विरामोऽस्तु" म्हटल्यावर अध्ययन थांबवावे. कुशासनावर पूर्वाभिमुख बसून, शिष्याने दोन्ही हातात कुश घेऊन, प्राणायाम करुन शुध्दी करुन घेतली पाहिजे.

विविध विषयांत आसक्त होणारी इंद्रिये व मन आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इंद्रियदमन व संयमन केल्याशिवाय विद्यार्थ्याचे चित्त एकाग्र होणार नाही. त्याशिवाय ज्ञानप्राप्ती होणार नाही. विषयांच्या उपभोगाने इंद्रियतृष्णा शमन न होता ती अधिक वाढत जाते. ज्याप्रमाणे अग्नीत तुपाची आहुती दिल्यानंतर अग्नीच्या ज्वाला विझत नाहीत तर अधिक प्रज्वलितच होतात.

सकाळी व संध्याकाळी संध्या करणे आवश्यक. तसेच समावर्तन [वेदाध्ययन पूर्ण करुन गृहस्थाश्रमात प्रवेश करेपर्यंत] काळापर्यंत सकाळ-संध्याकाळ अग्नीत समिधा हवन करणे, भिक्षावृत्ती, जमिनीवर झोपणे, व गुरुंच्या सेवेसाठी पाणी, फुले इ. आणणे आवश्यक असे.

लौकिक, वैदिक व अध्यात्मिक ज्ञान ज्या गुरुंकडून प्राप्त करुन घ्यायचे, त्याना प्रथम अभिवादन करणे आवश्यक. विद्यार्थ्यांनी करावयाच्या गोष्टी सांगून मग निषेधाच्या गोष्टींचा ही उल्लेख केलेला आहे.

> शय्यासने ऽध्याचरिते श्रेयसा न समाविशेत्।
> शय्यासनस्थश्चैवैनं प्रत्युत्थायाभिवादयेत्[४] ।।

वडील माणसांच्या गादीवर, आसनावर स्वत: न बसणे. तसेच स्वत:च्या आसनावर बसले असताही वडिलधारी माणसे आल्यानंतर उठून त्याना प्रणाम करायला पाहिजे.

वडिलधारी [गुरुजनांची] निंदा न करणे, तर सदैव गुरुजनांची सेवा करणे आवश्यक.

ब्रह्मचाऱ्याने पुढील गोष्टी टाळल्या पाहिजेत.

वर्जयेन्मधु मांसं च गन्धं माल्यं रसान्स्त्रिय :।
शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैन हिंसनम्[६] ।।

अभ्यङ्गमञ्जनं चाक्ष्णोरुपानच्छत्रधारणम्।
कामं क्रोधं च लोभं च नर्तनं गीतवादनम्[७] ।।

विद्याध्ययन करणाऱ्या शिष्यास अशी "आचार संहिता" पाळावी लागे. या मागे हेतू चांगलाच असावा. विद्यार्थ्याचे आचरण शिस्तबध्द व्हावे. त्यांच्या प्रत्येक कृतीला योग्य अर्थ असावा. त्याचे चित्त एकाग्र व्हावे. इंद्रिय संयमनाशिवाय शिक्षण हे अशक्य असल्याने ही बंधने शिष्यास अतिरेकी नसून योग्यच होती असे म्हणावेसे वाटते.

शैक्षणिक नियमांच्या पालनानी विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा प्राप्त होते. त्यांच्यावर चांगले संस्कार आणि शिक्षण यांच्या सहाय्याने जीवनाला अर्थ प्राप्त होतो. विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी हे आवश्यक आहे. एकदा जीवनाचे वळण बिघडले तर मात्र पुन्हा ते सुधारणे कठीण काम होते तेव्हा जीवनाचे वळण बिघडणारच नाही अशी व्यवस्था पूर्वीच्या शिक्षणपध्दतीत होती हे कबूल करावे लागेल. आजही त्याची अत्यंत गरज आहे.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## प्रकरण ४ - ब.

### -: सामाजिक नियम :-

प्राचीन काळी गुरुकुल पध्दतीचे शिक्षण असल्याने नगरापासून दूर, शांत वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण दिले जाई. समाजाच्या गर्दीपासून ते दूर असले तरी गुरु व शिष्य हे समाजाचे घटक असत. समाजापासून अलिप्त राहिले तरी समाजाला उपयोगी असेच शिक्षण असे. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांवर सामाजिक बंधन असे समाजाच्या हिताचा, कल्याणाचा विचार शिक्षणात प्राधान्याने केला जाई.

प्राचीन काळी ज्ञान, संस्कृती, वाङ्मय याचे संगोपन शिक्षणानेच झाले. त्यात भर घालण्याचे कामही शिक्षणानेच झाले असे म्हणायला हरकत नाही.

अनेक उपनिषदांच्या सुरुवातीला व शेवटी शांतिमंत्र म्हटला जात असे.

ॐ सह नाववतु। सह नौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै। तेजस्वि-नावधीतमस्तु। मा विद्विषावहै। ॐ शान्ति : शान्ति : शान्तिः।

या शांतिमंत्रात गुरुशिष्यांच्या संरक्षणाबद्दल प्रार्थना आहे. गुरुशिष्यानी पराक्रम करावा. त्याचे अध्ययन तेजस्वी राहावे. आपापसातील द्वेष नाहीसा व्हावा. विविध तापांची शांती होवो. या शांतीच्या मंत्रातून सामाजिक जाणीव दिली आहे. शिक्षणाच्या सुरुवातीपासून सामाजिक जाणीव करुन दिली आहे. असे संस्कार प्रत्येक विद्यार्थ्यांवर झाल्यानंतर मग तो समाज बिघडणारच नाही.

समाज निकोप राहण्यासाठी त्यातील घटकांवर अशा संस्कारांची गरज आहे.

विद्यार्थ्यांनी जे शिक्षण घ्यायचे ते स्वतःच्या पुरते मर्यादित नसून इतरांच्या कल्याणासाठी आहे. शिक्षणात स्वार्थी भावना नाहीशी होऊन त्यात मानवता, मानवी जीवनातील पूर्णता, भरभराट, समृध्दी, संपन्नता याचा विचार करणे आवश्यक ठरते. हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. अशा अर्थाचा शांतिपाठ एका उपनिषदाच्या सुरुवातीला आहे.

" ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते।
पूर्णात्पूर्णमादाय पूर्णमेवाव शिष्यते।। "

सुखी समाजाला पोषक असे वातावरण त्या काळात दिसून येते. तसे संस्कार त्या शिक्षणातून होत असत. जगात आपल्याप्रमाणेच असणाऱ्यांचा विचार केला पाहिजे. आपल्या सुखाबरोबरच इतरांच्या सुखाचा विचार झाला पाहिजे. सुख-दुःखे वाटून घेतली पाहिजेत. वाटल्याने सुख वाढते तर दुःख कमी होते. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्याने एकमेकांच्या सुखःदुखात सहभागी झाले पाहिजे. उपभोग घेताना देखील इतरांचा विचार करुनच घेतला पाहिजे. त्यागपूर्वक उपभोग घ्या. कोणाचेही धन घेऊ नका असा उपदेश उपनिषदात आढळतो.

" ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यांजगत्
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यचिद् धनम्।"

या जगात जे जे आढळते ते सर्व काही परमेश्वरानी आच्छादलेले आहे. जगाचा उपभोग त्यागपूर्वकच घ्या. म्हणजे आधी त्याग करा. जगासाठी

काहीतरी करून दाखवा, मग जगाचा फायदा घ्या. नुसते दुसऱ्याला लुबाडू नका. दुसऱ्यांवर अन्याय करू नका. जगा व जगू द्या. माणुसकीचे तत्त्वज्ञान या उपनिषदातून स्पष्ट होते. असे वागल्याने सर्वांनाच सुख-समाधान-आनंद मिळतो. शिक्षणातून हे संस्कार पूर्वी विद्यार्थ्यांवर होत असत.

श्रम प्रतिष्ठेला महत्त्व दिले गेले आहे. श्री व श्रम एकमेकांच्या सहाय्याने रहातात.
सत्याचे आचरण करावे, भेदाभेद मानू नये. सर्व मानवांचे कल्याण, सर्वांसाठी समृध्दी सर्व जीवांचे समाधान साधणे हा सत्यधर्म होय.

मार्ग दाखविणारी देवता = पूषा.
सूर्याचे तेज हे सत्य. सत्य प्रकाशयुक्त आहे. पण ते हिरण्यमय पात्राने झाकलेले असल्याने सत्यज्ञानाची प्राप्ती करून घेतली पाहिजे. त्यासाठी "पूषा" देवतेची प्रार्थना केली आहे.

ब्रह्म जिज्ञासू शिष्याला एका ब्रह्मज्ञानी गुरूने हा उपदेश केला आहे.

उपनिषद्‌कालात विचारांची केवढी प्रगल्भता होती! उदात्त विचारसरणी, सत्य शोधाची धडपड, "वसुधैव कुटुम्बकम्" ही वृत्ती दिसून येते. इतरांच्या सुखात आपले सुख सामावले आहे असे मानणे, त्यागाची वृत्ती या सर्वांचे दर्शन होते.

या काळात समाजात वर्ण, आश्रम होते. पण हे वर्ण जन्माने ठरलेले नसत.

ब्रह्मक्षत्रियवैश्यशूद्रा इति चत्वारो वर्णा:। तेषां ब्राह्मणा: एव प्रधान इति वेदवचनानुरूपं स्मृतिभिरप्युक्तम्। "[10]

पण "ब्राह्मण" संज्ञा कशी ठरवायची ? त्याचे विशिष्ट लक्षण सांगितले आहे. सत्य, ज्ञान-लालसा इ. ज्याच्याठायी आहे तो ब्राह्मण होय. ब्राह्मण कुळामध्ये जन्म झाला म्हणून ब्राह्मण नव्हे. "ब्राह्मण" वर्ण कोणालाही आपल्या कर्तृत्वाने प्राप्त करून घेता येत असे. ज्ञान संपादनाने ही पदवी लाभत असे.

वेगवेगळ्या ऋषींच्या उदाहरणाने हे स्पष्ट केले आहे. ऋषींचा जन्म कुठे झाला हे न पाहता त्यांचे ज्ञान किती श्रेष्ठ दर्जाचे आहे हे पाहिले पाहिजे.

प्रत्येकाने व्यवसाय निवडताना कुलपरंपरेने चालत आलेला व्यवसाय निवडावा किंवा आपापल्या आवडीनुसार त्यानी तो निवडावा. प्रत्येकाच्या अंगी असणाऱ्या गुणकर्तृत्वानुसार वर्ण ठरत असे. जन्मामुळे कुणी श्रेष्ठ व कनिष्ठ ठरत नसे. समाजाची विभागणी ही आदर्श विभागणी म्हणावी लागेल.

ब्राह्मण शब्दाची व्याख्या -

शब्द ब्रह्मणि निष्णातः परं ब्रह्मधिगच्छति।"[11]

प्रत्येक माणसाला मन दोन प्रकारचे असते.

शुध्दं वा शुध्दमेव च। तस्मान्निर्विषयं नित्यं मन : कार्यं मुमुक्षुणा।

- मोक्षासाठी मन निर्विषय करायला सांगितले आहे.

शुध्द व अशुध्द मन. अशुध्द मनापासून शुध्द मनाची सुटका करायला पाहिजे. म्हणजे स्वतःची उन्नती स्वतःच करणे आवश्यक आहे.

एकूण उपनिषदे दोनशेच्या आसपास असली तरी महत्त्वाची उपनिषदे मोजकीच आहेत. एका उपनिषदामध्ये "निदाघ" ऋषीने

महालक्ष्मीला अन्न मागितले. महालक्ष्मी हीअन्नपूर्णा आहे. उन्हाळ्यात अन्नाचा तुटवडा पडत असे. म्हणून भगवती अन्नपूर्णेला "अन्नं देहि" म्हणून मागणे मागितले आहे. समाजात उपेक्षित असलेल्या भुकेलेल्यांची, दीन-दुबळ्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी अन्न मागितले आहे. अन्न ही मानवाची प्राथमिक गरज आहे. म्हणून ऋषींनी संपूर्ण समाजाच्या काळजीने अन्न मागितले. त्यामागे स्वार्थी वृत्ती नाही.

पवित्र असे ज्ञान सर्वांना न देता योग्य अशाच शिष्याला दिले गेले पाहिजे. ज्ञानाचा सदुपयोग करणाऱ्याकडे ज्ञान गेले पाहिजे. अधिकारी शिष्यालाच ते मिळाले पाहिजे.

समाजात कोणतेही पद लायक असणाऱ्यानाच मिळाले पाहिजे. पात्रता नसताना जर एखादे पद मिळाले तर समाजाचा तोटा होईल. शिक्षणाच्या बाबतीतही हे तत्व लागू. ज्ञानाच्या क्षेत्रांत योग्य व्यक्तीचीच निवड शिक्षक किंवा गुरु म्हणून केला पाहिजेत.

योग्य गुरु व योग्य शिष्य असे एकत्र आलेतर समाजाचे सारे कल्याण होईल. समाजाचा पैसा, शक्ती, श्रम हे वाया घालवू नये. जगात सध्या बॉंब स्फोट घडताना दिसतात. त्या योगे जीवित व वित्त हानी घडून येते. अणुविज्ञानाचा असंस्कृत लोकानी असा दुरुपयोग केल्यामुळे समाजाचे व मानवी जीवनाचे नुकसान होते.

समाजात अशी विघातक प्रवृत्ती नसावी. समाजाचे हितच घडून येईल अशी कृती करण्याकडे सर्वांची प्रवृत्ती असली पाहिजे, तरच समाजाची प्रगती साधेल. आजही चोरी, दरोडा, मारहाण, खून इ. घटना घडतात. ते विकृत समाजप्रवृत्तीचे द्योतक आहे. स्वार्थासाठी मनुष्य पशूपेक्षाही हीन कृत्य करतो. शेवटी सर्वनाश ओढवतो.

शिक्षण घेऊन समाजाचा एक घटक म्हणून वावरत असताना सद्सद्विवेक बुध्दीनेच कोणतेही कृत्य केले पाहिजे.

गुरुकुल पध्दतीत शिष्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

"यतय: भिक्षार्थं ग्रामं प्रविशन्ति पाणि पात्रं उदर पात्रं वा।
तद् विष्णो: परमं पदं सदा पश्यन्ति सूरय: ।
ब्रम्हचर्यं अहिंसां च अपरिग्रहं च सत्यं च।
यत्नेन हे रक्षातो ३ हे रक्षातो३ हे रक्षात इति। [१२]

शिष्यानी फक्त दण्ड व कौपीन धारण करावी. बाकी सर्वांचा त्याग करावा. अशा शिष्याच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी समाजाने उचलावी.

यामुळे विद्यार्थी आपला वेळ ज्ञानार्जनात जास्तीत जास्त घालवू शकतात. समाजाचे हे ऋण शिक्षण संपल्यानंतर फेडू शकतात. शिक्षणाच्या उपयोग समाजासाठी केला म्हणजे समाजाबद्दलची कृतज्ञता व्यक्त होई.

या काळात गुरु, शिष्यांच्या कडून मोबदला घेत नसत. नि:शुल्क सेवा करीत असत. शिक्षणानंतर विद्यार्थी आपल्या इच्छेनुसार गुरुदक्षिणा देत असत.

सप्तद्वीपवती भूमिर्दक्षिणार्थं नावकल्पते।
तस्माच्छ्रद्धया यां कांचिद्वां दद्यात्सा दक्षिणा भवति।। [१३]

जी दक्षिणा द्यायची असेल ती श्रद्धापूर्वक दिली पाहिजे. गुरुचा उदरनिर्वाह

त्यावर असे. समाजाने गुरुशिष्य यांची पोटापाण्याची काळजी वाहिली तर त्यांचे अध्यापन व अध्ययन इ. गोष्टी अधिक काळजीपूर्वक, जास्तीत जास्त वेळ करता येईल. समाजाने गुरु-शिष्याना मदत केली तर त्यांच्या शिक्षणाचा उपयोग निश्चितपणे समाजासाठीच केला जाईल. अशा त-हेने समाज व गुरु-शिष्य एकमेकाचे बांधील आहेत. एकमेकांच्या हिताचे परस्परांवर बंधन आहे.

या जगात ज्ञान अमर्यादित आहे. गुरु-शिष्यानी त्या ज्ञानाची क्षेत्रे अधिकाधिक विस्तृत केली पाहिजेत. ज्ञान एक साधना आहे. ती बारा ते चौदा वर्षे सातत्याने करायची आहे. म्हणून शिष्याला ज्ञानग्रहण करताना अनेक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. एकाग्र चित्ताने, इंद्रियसंयमन ठेऊन, गुरुंच्या आज्ञापालनाने व गुरुंची सेवा करुन हे ज्ञानव्रत करायचे आहे.

उपनिषादातील गूढ विद्या एकान्तात गुरुकडून शिष्यानी आत्मसात करायची आहे. "हे हृदयीचे ते हृदयी घातले." अशी ही ज्ञानप्रक्रिया आहे. यात तर्क वितर्काला जागा नाही. गुरुंवर श्रध्दा ठेऊनच, विश्वास संपादन करुनच ही विद्या शिष्याने मिळवायची आहे.

पूर्वीच्या काळी समाज व्यवस्था चार वर्णाश्रमांच्या पायावर आरंभाक्रम होती. हे चार वर्ण एकमेकाला अनुकूल असल्याचे वर्णन "समाजपुरुषा"च्या रुपकातून आढळते.

"ब्राह्मणोऽस्य मुखं आसीत बाहू राजन्य: कृत:
उरु तदस्य यद्वैश्य: पद्भ्यां शूद्रो अजायत।" [१४]

ज्ञानश्रेष्ठ असणारा वर्ण म्हणजे ब्राह्मण. समाजरूपी पुरूषाचे मुख म्हणजे ज्ञानसंपन्न ब्राह्मण वर्ण होय. पराक्रमी क्षत्रिय वर्ण म्हणजे त्याचे हात होत. तर संपन्न व्यापारी वर्ग [वैश्य] म्हणजे या पुरूषाच्या मांड्या होत. आणि सेवावृत्ती आचरणारा शुद्र वर्ग म्हणजे याचे भारभक्कम असे पाय होत. या चारी वर्णांच्या मजबूतीवर समाजाचे स्वास्थ्य अवलंबून राहणार. कोणताही वर्ण कनिष्ठ-श्रेष्ठ नाही. तुच्छ नाही. प्रत्येक अवयव शरीरास गरजेचाच असतो. कोणताही अवयव कमकुवत असेल तर शरीर स्वास्थ्य नाहीसे होईल तसे या समाज पुरूषाचे आहे. म्हणून या समाजात सर्वांनाच महत्व आहे. प्रत्येकानी आपले कर्तव्य प्रामाणिकपणाने पार पाडायचे आहे. आपापसातील भांडणे ही समाजातील विकृती म्हणावी लागेल. तेव्हा प्रत्येकाने व्यापक रीतीने विचार केला पाहिजे. आणि हे शिक्षण गुरू-शिष्य संबंधातून दिले गेले पाहिजे. सध्याच्या काळात देखील हे आवश्यक आहे.

पूर्वीच्या काळी विद्यार्थ्यांचे शिक्षण संपल्यानंतर गुरुकुलातून ते बाहेर पडत त्यावेळी गुरु त्याना उपदेश करीत.

"सत्यं वद। धर्मं चर। स्वाध्यायान्मा प्रमदः। आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः। सत्यान्न प्रमदितव्यम्। धर्मान्न प्रमदितव्यम्। कुशलान्न प्रमदितव्यम्।[१५]

"आचार्य देवो भव। अतिथि देवो भव।"

"यानि अस्माकं सुचरितानि तानि सेवितव्यानि। नो इतराणि।"[१६]

ब्रह्मचर्याश्रम संपून गृहस्थाश्रमात पर्यायाने समाजात वावरत असताना वरील उपदेश विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त व आवश्यक असा आहे. त्यात सामाजिक कर्तव्यांची जाणीव करून दिली आहे. शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांचे

वर्तन नम्रच हवे. गुरुजनांचा त्याने आदर राखला पाहिजे. माता-पिता-आचार्य-अतिथी हे सर्व परमेश्वराप्रमाणे आहेत, असे मानून त्यांचा योग्य तो सन्मान करण्याचा सल्ला गुरुंनी दिला आहे.

सत्य, धर्म, कल्याण यापासून भ्रष्ट न होण्यास सांगितले आहे. शिक्षण संपले म्हणजे अभ्यास संपला, असे नसून पदवीधारकाने सुध्दा नियमित स्वाध्याय करणे आवश्यक आहे. अध्ययन हे तेजस्वी राखण्यासाठी ते अखंड चालू ठेवले पाहिजे. ज्ञान, विद्या यांचे कधीही विस्मरण होता कामा नये. शस्त्रास्त्रे जशी नेहमी घासून चमकदार, धारदार ठेवावी लागतात, तसे ज्ञान नेहमी "तयार" ठेवले पाहिजे. नाही तर विद्याधनास देखील गंज चढेल.

वडीलधारी माणसांचे आदर्श वर्तन असेल तर त्याचे अनुकरण केले पाहिजे. वाईट गोष्टींचा नेहमी त्याग केला पाहिजे. आपल्या ज्ञानाचा उपयोग सर्वांसाठी केला पाहिजे. स्वार्थासाठी नाही, हे बजावले आहे.

गृहस्थाश्रमाची कर्तव्ये कोणती ते यात सांगितले आहे. घरातील वडील माणसे यांच्याशी आदराने वागले पाहिजे. त्यांची सेवा केली पाहिजे तसेच दारी आलेल्या अतिथींचे नेहमी स्वागत झाले पाहिजे. त्याना जेवायला घालणे हे कर्तव्य आहे. त्याच्या मोबदल्यात त्यांच्याकडून ज्या सदिच्छा मिळतील त्या आपले कल्याण घडविण्यास कारणीभूत ठरतात. अशा त-हेने अनेकांचे शुभाशीर्वाद व सदिच्छा संपादन करणे यातच आपले हित असते. हे संस्कार शिक्षणातूनच मिळत असल्याने स्वदेश, स्वधर्म, राष्ट्र इ. बद्दलची कर्तव्ये पार पाडण्यास कोणतीच अडचण पडत नसे.

गुरुगृही राहणाऱ्या शिष्याला व्यावहारिक शिक्षण मिळत असे. श्रमाची प्रतिष्ठा, सेवाभाव, प्रामाणिक वर्तन इ. चे धडे गुरुगृहीच मिळत असल्याने गृहस्थाश्रमीं, शिष्याना कोणतीही अडचण निर्माण होत नसे. सच्चारित्र्य अंगी बाणले असल्याने स्वार्थ, अविवेक त्यांच्या मनाला शिवत सुध्दा नसे.

गुरुकुलात शिक्षण घेणारे राजपुत्र असोत वा दरिद्री पुत्र असोत, दोघाना तेथे समान वागणूक मिळत असे. सर्व शिष्यांमध्ये समभाव निर्माण झालेला असे. त्यांमुळे त्यांच्यात आपापसातही आपुलकीची, समतेची भावना निर्माण होत असे. अतूट मैत्रीचे नाते निर्माण होई. श्रीकृष्ण-सुदामा यांच्यात आर्थिक तफावत असली तरी मैत्रीच्या नात्यात ती आड येत नव्हती. ती बाल मैत्री चिरकाल टिकणारी होती.

आजही अशी मैत्री, संघभावना निर्माण व्हायला पाहिजे.

गुरुंच्या आश्रमात राहत असताना शिष्याना भिक्षावृत्तीने राहावे लागत असे. भिक्षा मागण्यात कोणत्याही प्रकारची वैषम्यभावना नसून पवित्र भावना होती. अनेक घरची भिक्षा एकत्र करुन सर्वांनी सारखी वाटून खाणे, अन्न हे "ब्रह्म" आहे या भावनेनेच त्याचे सेवन करणे, ठराविकच आहार-विहार करणे अशी बंधने विद्यार्थ्यांवर असत. त्यामुळे जिभेचे चोचले पुरविणे, शरीराला त्रास होईल असे वागणे, स्वच्छंदपणा इ. गोष्टीना योग्य तो आळा बसून चांगल्या सवयी बालवयातच लागत असत. त्या चांगल्या सवयी आयुष्यभर टिकत असत. त्याचा जीवनावर चांगला परिणाम होत असे.

भिक्षेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा समाजाशी संपर्क घडत असे. गृहस्थानी आदराने भिक्षा घालणे, आणि भिक्षेकऱ्यानी ती "अन्नं ब्रह्म" या पवित्र भावनेने स्वीकारणे यातून त्या अन्नाचे चांगले संस्कार विद्यार्थ्यांवर घडत असत. कोणत्याही कृती मध्ये त्या मागची भावना शुध्द, पवित्र असेल तर ती कृती अतिशय चांगल्या दर्जाची घडते.

अशा संस्कारातून निकोप, निस्वार्थी भावना समाजात वाढीस लागते.

"सर्वे पि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःखामाप्नुयात्॥"

या प्रार्थनेतून सर्वांचे कल्याण, सुख, आरोग्य यांचा विचार केलेला दिसतो.

आपण प्रत्येकजण आरतीनंतर जी मंत्रपुष्पांजली भक्तिभावनेने म्हणतो ती आपल्या हिंदुधर्मियांच्या एका उज्ज्वल परंपरेची आणि ज्वलंत राष्ट्रनिष्ठेची द्योतक आहे.

सर्व इच्छांची पूर्ती करणाऱ्या, सर्वेश्वरसंपन्न, सर्वसामर्थ्यवान अशा "वैश्रवण" कुबेराला प्रार्थना केली आहे.

"ओम स्वस्ति। साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठयं
राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायीस्यात सार्वभौम : सार्वायुष्य
आंतादा परार्धात्। पृथिव्यै समुद्र पर्यंताया एकराळिति।"

समुद्र वलयांकित पृथ्वीचे राज्य आपल्या राजाला मिळावे, म्हणजेच आपले राष्ट्र सर्व जग व्यापणारे व्हावे अशी सुयुत्सु मनोकामना

बाळगणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या राष्ट्रीय मनोभूमिकेचे दर्शन आपणास ह्या मंत्रपुष्पांजलीमधून होते.

गुरुकुलात प्रकृती, जीव, ब्रह्म इ. ये आध्यात्मिक शिक्षण मिळून तेथे त्याचा आत्मिक विकास होत असे. ज्ञान व विज्ञान यांची सांगड घातलेले शिक्षण दिले जात असे. प्रत्येक आश्रमाची कर्तव्ये कोणती ? यांची जाण करुन दिली जात असे. विश्व मानवतावादी दृष्टीतून संन्यासाश्रमाचे अंतिम लक्ष्य त्याला सांगितले जाते. नुसता मौखिक उपदेश नसून आचरणातून शिक्षण दिले जात असे. या सर्वातून सामाजिक उत्कर्ष, राष्ट्रीय वृत्ती निर्माण केली जात असे.

१] हिरण्यगृह्यसूत्रा [२.५.११]

२] ऋग्वेद [१३.२.११]

३] छांदोग्योपनिषद [अ.६ खं. १ ते १६]

४] छांदोग्योपनिषद [अ.४.खं.१०]

५] मनुस्मृति: [अ.२ श्लो.११९]

६] मनुस्मृति: [अ.२ श्लो.१७७]

७] मनुस्मृति: [अ.२ श्लो.१७८]

८] ईशावास्योपनिषद्

९] ईशावास्योपनिषद् [श्लो.१]

१०] वज्रसूचिकोपनिषद् [श्लो.२]

११] अमृतबिन्दूउपनिषद्

१२]

१३] बृहज्जालोपनिषद् [ब्रा.६ श्लो.१२]

१४] पुरुषसूक्त

१५] तैत्तरीयोपनिषद् [अ.१ अनुवाक ११ श्लो.१]

१६] तैत्तरीयोपनिषद् [अ.१ अनुवाक ११ श्लो.२]